# आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना

# (IEDSSA)

महाराष्ट्र राज्य

संघटनेची सुधारित स्पर्धा नियमावली

(२०२४-२०२५ पासून लागू)













खाजगी वितरणासाठी

# आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना

# (IEDSSA)



## डॉ. राजेंद्र का. पाटील

अध्यक्ष

आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना

(IEDSSA)

# संदेश

अभियांत्रिकी पदविकेच्या विद्यार्थ्यांना विविध खेळांमध्ये प्राविण्य दाखविण्याची संधी उपलब्ध करून देण्याकरिता आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटने (I.E.D.S.S.A.) ची स्थापना दिनांक २९ नोव्हेंबर १९६६ रोजी करण्यात आलेली आहे.

नविन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार (NEP-2020) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शैक्षणिक अभ्यासक्रमा बरोबरच क्रीडागुणांना देखील महत्व देण्यात आलेले आहे. त्या अनुषंगाने तंत्र शिक्षण अभ्यासक्रमा सोबतच विद्यार्थ्यांच्या शारिरिक व मानसिक दृष्ट्या विकासाला प्रोत्साहित करणे हा संघटनेचा मुख्य हेतू आहे. महाराष्ट्र राज्यातील अभियांत्रिकी व औषध निर्माण शास्त्र पदविका शिक्षण देणाऱ्या संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी दरवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून विद्यार्थ्यांच्या क्रीडागुणांना वाव देण्यासाठी ही संघटना कार्य करत आहे. या सर्व स्पर्धांच्या आयोजनामध्ये विभागीय कार्यालयांचा नेहमीच मोठा सहभाग आहे.

आजपर्यंत या संघटनेची एकूण सदस्य संख्या ३७५ पर्यंत पोहोचलेली आहे. या संघटनेमार्फत दरवर्षी राबविण्यात येणाऱ्या क्रीडा स्पर्धांकरता राज्यातील मुलांचे व मुलींचे मिळून एकूण १४ विभागीय स्तर आखण्यात आलेले आहेत. दरवर्षी या क्रीडा स्पर्धांमध्ये सुमारे १०,००० मुला-मुलींचा सहभाग नोंदविण्यात येतो. या क्रीडा स्पर्धांमध्ये विजेता व उपविजेता यांना संघटनेकडून पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात येते.

या संघटनेच्या आजपर्यंतच्या प्रगतीमध्ये विभागीय कार्यालये तसेच संघटनेशी संलग्नीत असलेल्या राज्यातील विविध पदविका व औषधनिर्माण संस्थांचा देखील सिंहाचा वाटा आहे. MSBTE ने देखील स्पर्धांच्या आयोजनासाठी व विद्यार्थ्यांच्या सहभागासाठी संस्थेच्या वार्षिक कामगिरीच्या मूल्यमापनासाठी गुण दिले आहेत.

क्रीडा स्पर्धा आयोजनामध्ये एकसारखेपणा येण्यासाठी नियमावलींची पुस्तिका आवश्यक आहे. त्या अनुषंगाने सर्व संस्थांच्या व विभागीय कार्यालयांच्या सोयीच्या दृष्टीने ही अद्ययावत स्पर्धा नियमावली तयार केलेली आहे. सर्वांनी खिलाडू वृत्तीने नियमावलीचे पालन करून खेळांव्दारे विद्यार्थ्यांच्या परिपूर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी कटीबद्ध असावे. यावर्षीच्या खेळांच्या आयोजनासाठी माझ्या शुभेच्छा !

क्रीडा वर्धयते बलम् !

डॉ. राजेंद्र का. पाटील<br>
अध्यक्ष<br>
आंतर पदविका अभियांत्रिकी<br>
विद्यार्थी क्रीडा संघटना

# अनुक्रमणिका


| क्र. | तपशील | पान क्र. |
|---|---|---|
| १. | संस्थेची घटना | ३ |
| २. | स्पर्धेचे सर्वसाधारण नियम | १४ |
| ३. | क्रीडा प्रकार व त्यांचे तांत्रिक नियम | १६ |
| ४. | सर्व विभागीय मुख्यालय यादी | २७ |
| ५. | संघटनेची कार्यकारिणी | |

# आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना

## महाराष्ट्र राज्य

## संघटनेची सुधारित स्पर्धा नियमावली

## (२०२४ -२०२५ पासून लागू)

१) **शीर्षक:** ही संघटना "Inter Engineering Diploma Students' Sports Association, Maharashtra State" या नावाने संबोधली जाईल.

२) उद्देश: अभियांत्रिकी, औषधनिर्माण शास्त्र पदविका शिक्षण देणाऱ्या महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्थांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रतिवर्षी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून त्यांच्या क्रीडागुणांस वाव देऊन त्यांचे कौतुक करणे.

३) **सभासदत्व :** खालील अटी पूर्ण करणाऱ्या शैक्षणिक संस्थेस सभासदत्व मिळेल.

मा. संचालक, तंत्रशिक्षण मंडळ, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे अधिपत्याखालील तीन अथवा दोन वर्षे मुदतीचा अभियांत्रिकी, फार्मसी अथवा तांत्रिकी विषयाचा पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या शैक्षणिक संस्थेस सभासदत्व मिळेल.

प्रत्येक शैक्षणिक संस्थेस प्रतिवर्षी खालीलप्रमाणे वर्गणी द्यावी लागेल (बदलाचे आधीन).

अ) नवीन सभासदत्वासाठी अर्ज करताना रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) रजिस्ट्रेशन फी म्हणून भरावी लागेल.

ब) यानंतर प्रतिवर्षी विद्यार्थी फी (Prorata Contribution) प्रति विद्यार्थी रु. ३०/- द्यावी लागेल.

क) शैक्षणिक संस्थेने एकदा सभासदत्व घेतल्यानंतर वार्षिक क्रीडा स्पर्धेत भाग घेतला अथवा कोणत्याही कारणास्तव भाग घेतला नाही तरी प्रतिवर्षी वर उल्लेख केल्याप्रमाणे वर्गणी (फी) भरावी लागेल.

४) **जनरल बॉडी :** सभासद संस्थेचे संस्थाप्रमुख किंवा प्रतिनिधी ही जनरल बॉडी स्थापन करतील. जनरल बॉडीची दरवर्षी कमीत कमी एक बैठक होईल. ही बैठक स्पर्धांना सुरुवात होण्यापूर्वी होईल. जनरल बॉडीच्या सर्वसाधारण सभेचे कामकाज सुरु होण्यासाठी कमीत कमी निम्म्या सभासदांची गरज असेल अन्यथा कोरम अभावी सभेचे कामकाज तहकूब करण्यात येईल, तहकुबीनंतर अर्ध्या तासाने होणाऱ्या बैठकीस कोरमची आवश्यकता राहणार नाही. सभेचे सर्व कामकाज मा. अध्यक्ष यांचे मार्गदर्शनाखाली चालेल.

५) कार्यालयीन सेवक (Office Bearers): जनरल बॉडीचे कामकाज खालील लोक पाहतील :

१) अध्यक्ष: संघटनेची नोंद चॅरीटी कमिशन ट्रस्ट पुणे येथे केली असल्याने प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन पुणे, हेच संघटनेचे अध्यक्ष राहतील.

२) सचिव :<br>
३) सहाय्यक सचिवः<br>
४) खजिनदार:

(वरील तिघांची) यांची नेमणूक मा. अध्यक्ष हे त्यांच्या संस्थेमधून करतील.

**६) जनरल बॉडीचे अधिकार व कार्ये खालील प्रमाणे असतील :**

१) सर्व विभागीय व आंतर विभागीय स्पर्धांच्या आयोजनावर नियंत्रण ठेवणे.

२) विभागांची रचना करणे तसेच विभागीय व आंतर विभागीय स्पर्धांची मुख्यालये ठरविणे.

३) स्पर्धांच्या सुलभ नियोजनासाठी नियमावली तयार करणे.

४) स्पर्धासाठीचे अंदाजपत्रक तयार करून त्यास मंजुरी देणे.

५) विभागीय व आंतरविभागीय समित्यांना स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी मंजूर अंदाजपत्रकाप्रमाणे रक्कम अदा करणे.

६) प्रत्येक विभागाच्या स्पर्धांच्या तारखा, खेळांचे प्रकार व त्यांच्या आयोजनाची पद्धत निश्चित करणे.

७) प्रत्येक वर्षीच्या जमाखर्चाचा ताळेबंद तयार करून त्याची एक प्रत सर्वसाधारण बैठकीच्या वेळी उपलब्ध राहील. प्रत सभासदांना हवी असल्यास देण्यात येईल.

८) स्पर्धा यशस्वीरीत्या व सुलभपणे पार पाडण्यासाठी वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना करणे.

**७) विभागीय व आंतर विभागीय समिती (स्थानिक क्रीडा समिती):**

जनरल बॉडीने निश्चित केलेल्या प्रत्येक विभागासाठी व आंतरविभागासाठी एक क्रीडा समिती असेल. प्रत्येक विभागीय व आंतर विभागीय समितीत खालील सभासद असतील.

१) अध्यक्ष २) सचिव ३) खजिनदार आणि ३ सदस्य (संख्या ३ पेक्षा जास्त असू नये.)

क्रीडा स्पर्धा आयोजन करणाऱ्या यजमान संस्थेचे प्राचार्य वरील समित्यांची निवड करतील.

वरील समिती सदस्यांची नावे व बैठकीचा वृत्तांत ताबडतोब विभागाच्या मुख्यालयात पाठवावा.

**८) विभागीय व आंतर विभागीय समितीचे अधिकार व कार्ये:**

१) आवश्यकतेनुसार वेळोवेळी विभागीय व आंतर विभागीय समित्या अगर कार्यकारिणी स्थापन करून त्यांना कार्यक्षेत्र व अधिकार प्रदान करणे.

२) विभागीय व आंतर विभागीय स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी कार्यक्रम निश्चित करणे.

३) वर्षासाठीचे अंदाजपत्रक निश्चित करणे.

४) दोन संस्थांमध्ये काही वादविवाद निर्माण झाल्यास तो मिटविण्याचा प्रयत्न करणे, त्यासाठी लागणाऱ्या प्रोटेस्ट समितीची स्थापना करणे.

५) एखाद्या संस्थेचा संघ किंवा खेळाडू स्पर्धेच्या दरम्यान गैरवर्तणूक करताना आढळल्यास समितीच्या अध्यक्षांनी ताबडतोब पुढील कारवाईसाठी मुख्यालयाला तपशील सादर करावा व त्याची एक प्रत संबंधित संस्थेच्या प्राचार्यांना पाठवावी.

६) विभागीय व आंतर विभागीय समितीच्या अध्यक्षांनी स्पर्धा पार पडताच त्याचा निकाल ताबडतोब मुख्यालयाला पाठवावा व त्याची एक प्रत आंतरविभागीय स्पर्धांचे आयोजन करणाऱ्या संस्थेस व भाग घेणाऱ्या सर्व संस्थांना पाठवावी.

**९) स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लागणारी पात्रता व अटी:**

१) स्पर्धेत भाग घेणारा विद्यार्थी, या संघटनेचे सभासदत्व घेतलेल्या शैक्षणिक संस्थेतील पटावर असलेल्या नियमित विद्यार्थ्यांपैकी असला पाहिजे (Bonafied student).

२) सदर विद्यार्थ्यांची नोंदणी (एनरोलमेंट) १ सप्टेंबर पूर्वी झालेली असावी किंवा त्याचा प्रवेश संचालक, तंत्रशिक्षण संचालनालयाने घोषित केलेल्या प्रवेशाच्या शेवटच्या तारखेपूर्वी झालेला असावा. या दोहोंमध्ये जी नंतरची तारीख असेल ती गृहीत धरावी.

३) स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय संबंधीत कॅलेंडर वर्षाच्या १ सप्टेंबरला २१ पेक्षा जास्त असू नये.

४) तंत्रशिक्षण मंडळाने घोषित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम तारखेच्या आत प्रथम सत्रात प्रवेश घेतलेले विद्यार्थी तसेच दुसऱ्या सत्रासाठी सत्र सुरु झाल्यानंतर १५ दिवसांचे आत प्रवेश घेतलेले विद्यार्थी भाग घेण्यास पात्र आहेत.

५) स्पर्धेत भाग घेणाऱ्या विद्यार्थ्याने एकापेक्षा जास्त संस्थेत (तंत्रनिकेतन व फार्मसी इ. महाविद्यालय) प्रवेश घेतलेला असता कामा नये.

६) आंतर विभागीय, वैयक्तिक व सांघिक स्पर्धेसाठी विभागीय स्पर्धेतील फक्त विजयी खेळाडू/ संघ भाग घेण्यास पात्र ठरतील.

७) सांघिक खेळांसाठी फक्त विभागीय सामने खेळलेले विजयी संघाचे खेळाडूच आंतरविभागीय सामन्यांसाठी पाठविणे बंधनकारक आहे.

**१०) स्पर्धा प्रवेशिका (Entries):**

सभासद असणारी प्रत्येक संस्था स्पर्धेसाठी खालीलप्रमाणे प्रवेशिका पाठवू शकतील.

१) सांघिक क्रीडा प्रकारात विभागीय स्पर्धेसाठी प्रत्येक सभासद संस्थेचा एकच संघ भाग घेऊ शकेल.

२) वैयक्तिक क्रीडा प्रकारातील प्रत्येक क्रीडा प्रकारात प्रत्येक सभासद संस्थेचे प्रत्येकी दोन खेळाडू भाग घेऊ शकतील.

३) आंतर विभागीय स्पर्धेसाठी मात्र कमीत कमी चार संघ सहभागी झाल्याशिवाय ती स्पर्धा घेतली जाणार नाही.

४) या स्पर्धेसाठी पाठविण्यात येणाऱ्या प्रवेशिका नमूद केलेल्या योग्य त्या पात्रता प्रमाणपत्रातच भरून संस्थेच्या प्रमुख (प्राचार्य किंवा प्रबंधक) यांच्या सहीने सोबत दहावीचे प्रमाणपत्रासह विभागीय किंवा आंतरविभागीय विभागाच्या मुख्यालयाने त्यांनी निश्चित केलेल्या शेवटच्या तारखेपूर्वी पोहचतील अशा पाठवाव्यात.

५) ॲथलेटिक्स स्पर्धेसाठीच्या प्रवेशिका सोबत जोडलेल्या नमुन्यात भरून पाठवाव्यात.

६) काही अपरिहार्य कारणामुळे एखादा संघ स्पर्धेत सहभागी होऊ शकणार नसल्यास सदर संस्थेच्या प्रमुखांनी किंवा व्यवस्थापकांनी संबंधित मुख्यालयाला यजमान संस्थेला ईमेलने अगोदर कळवावे, यामुळे संबंधित यजमान संस्थेला स्पर्धा आयोजन सुलभ होईल.

**११) स्पर्धेच्या सोडती (Draws):**

विभागीय स्पर्धेसाठीच्या सोडती त्या त्या विभागाच्या पहिल्या बैठकीच्या वेळी सर्व संस्था प्रतिनिधींच्या उपस्थितीत नियमाप्रमाणे काढल्या जातील, किंवा स्पर्धेच्या आयोजनाच्या ठिकाणी सकाळी १०.०० वाजता सर्व उपस्थित संस्था सभासदांच्या उपस्थितीत काढल्या जातील.

**१) सोडतीची पद्धत (क्रीडा नियमांनुसार)**

ज्यावेळी स्पर्धेतील सहभागी संघ २ च्या पटीत असतील (उदा. २, ४, ६, ८, इ.) त्यावेळी दोन दोन च्या जोड्यांमध्ये सोडती होतील. परंतु जेव्हा सहभागी संघ दोनच्या पटीत नसतील त्यावेळी फक्त पहिल्या फेरीतच पुढे चाल दिली जाईल.

पुढे चाल देण्याची पद्धत (Bye) उदा. स्पर्धेत ५ संघ सहभागी झाले असतील तर २ च्या पटीतील पुढील अंक (उदा. २,४,८, १६.....) व सहभागी संघ यातील फरकाएवढे Bye दिले जातील.

उदा. सहभागी संघ ५ असताना, २ च्या पटीतील ५ च्या पुढील अंक ८. म्हणजेच ३ संघाना पुढे चाल.

पुढे चाल देण्याची पद्धत -

उदा. सहभागी संघ ५

१) RUNNER UP
२) ----- BYE
३) TEAM B
४) TEAM C
५) TEAM A
६) ----- BYE
७) ----- BYE
८) WINNER

उदा. सहभागी संघ ६

१) RUNNER UP
२) ----- BYE
३) TEAM A
४) TEAM B
५) TEAM C
६) TEAM D
७) ----- BYE
८) WINNER

२) सांघिक खेळाच्या स्पर्धेमध्ये मागील वर्षाच्या विजेत्या व उपविजेत्या संघाना अनुक्रमे खाली (Bottom) व (Top) ठेवावे.

उदा. सहभागी संघ ९

१) RUNNER UP
२) ----- BYE
३) TEAM A
४) ----- BYE
५) TEAM B
६) ----- BYE
७) TEAM C
८) TEAM D
९) ----- BYE
१0) TEAM E
११) ----- BYE
१२) TEAM F
१३) ----- BYE
१४) TEAM G
१५) ----- BYE
१६) WINNER

**१२) क्रीडाप्रकार (EVENTS):**

या स्पर्धेसाठी पुढील क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात येईल. १. चेस २. कॅरम ३. टेबलटेनिस ४. बॅडमिंटन ५. व्हॉलीबॉल ६. बास्केटबॉल ७. फुटबॉल ८. हॉकी ९. क्रिकेट १०. कबड्डी ११. खो खो १२. वेट लिफ्टींग १२. कुस्ती १३. स्विमिंग १४. ॲथलेटीक्स

**१३) रंग (Colour)**

आंतर पदविका क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व सभासद संस्थांनी आपल्या संस्थेने निश्चित केलेला रंग, बोधचिन्ह व ध्वज यांचा वापर करावा.

**१४) ध्वज (Flag)**

१) असोसिएशनच्या ध्वजाचा आकार १५० सेमी x १०० सेमी असेल. ध्वजाच्या वरील व खालील दोन्ही बाजूस आडवे सोनेरी रंगाचे पट्टे असतील. मध्यभागी आकाशी रंगाचा आडवा पट्टा असेल. त्यावर मध्यभागी ५० सेमी x ३० सेमी आकाराचे असोसिएशनचे बोधचिन्ह असेल. प्रत्येक आंतरविभागीय स्पर्धेच्या ठिकाणी हा ध्वज फडकविला जाईल.

२) प्रत्येक सभासद संस्थेचा स्वतःचा ध्वज असावा. त्याचा आकार १५० सेमी x १०० सेमी असावा. त्याचा रंग व बोधचिन्ह त्या संस्थेने निश्चित करावे. विभागीय तसेच आंतरविभागीय स्पर्धेच्या दरम्यान हा ध्वज वापरावा.

**१५) सामनाधिकारी व पंच (Referees & Umpires)**

सर्व स्पर्धेसाठी जिल्हा क्रीडा संघटना (D.S.A.) मान्यताप्राप्त असलेल्या पंचांची व सामनाधिकाऱ्यांची नेमणूक करावी. पंचांचा निर्णय स्पर्धेदरम्यान अंतिम व बंधनकारक राहील. पंचांचे मानधन स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या यजमान संस्थेने द्यावे.

**१६) स्पर्धेचे नियम (Rules for the conduct of the event)**

प्रत्येक सभासद संस्थेकडे इंटर इंजिनिअरींग डिप्लोमा स्टुडंटस् स्पोर्टस् असोसिएशनने तयार केलेल्या नियमांचे पुस्तक असावे. या पुस्तकात उल्लेख केलेल्या नियमांनुसार स्पर्धा खेळवल्या जातील.

**१७) तक्रार निवारण समिती (Protests)**

१) प्रत्येक विभागीय व आंतर विभागीय स्पर्धेसाठी ५ सभासदांची तांत्रिक समिती स्थापन करावी. त्यात यजमान संस्थेचे प्राचार्य, मुख्यालयाचा एक प्रतिनिधी, एक पंच व इतर सहभागी संस्थापैकी दोन संघ व्यवस्थापक असतील.

२) कोणतीही तक्रार संघ व्यवस्थापकांच्या सहीने लेखी स्वरूपात तो सामना संपण्यापूर्वी तांत्रिक समितीकडे सादर करावी व सामन्यात कोणताही व्यत्यय आणू नये.

३) तक्रार अर्जासोबत रु. ५००/- तक्रार निवारण रक्कम भरावी लागेल. तक्रार फेटाळली गेल्यास सदर रक्कम परत केली जाणार नाही.

४) तांत्रिक समिती, मैदानी खेळांच्या स्पर्धा (ॲथलेटिक्स) सोडून इतर सर्व स्पर्धांच्या तक्रार निवारणाचे काम करील, परंतु ॲथलेटिक्स ज्यूरी ऑफ अपील तक्रार निवारण निश्चित करतील.

५) स्पर्धेतील दोन संघादरम्यान एखादा सामना सुरू होण्यापूर्वी जर एखाद्या संघाने दुसऱ्या संघाविरुद्ध तक्रार नोंदविल्यास तो सामना अंडर प्रोटेस्ट खेळवला जाईल. परंतु त्याचा निकाल तांत्रिक समितीच्या निर्णयापर्यंत घोषित केला जाणार नाही.

६) विभागीय तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील. त्याविरुद्ध राज्य मुख्यालयाकडे संपर्क साधण्यास हरकत नाही.

७) तक्रार निवारण समितीला एखाद्या तक्रारीत तथ्य आढळून आल्यास ज्या संघाविरुद्ध तक्रार असेल त्या संघाला त्या स्पर्धेतून बाद ठरवण्यात येईल.

८) एखाद्या संघाने अथवा संघातील खेळाडूने सामन्यादरम्यान अथवा निवासाच्या ठिकाणी गैरवर्तन केल्याचे आढळल्यास यजमान संस्थेच्या प्राचार्यांनी त्यांचा अहवाल लिखित स्वरुपात तक्रार निवारण समितीकडे सादर करावा. तक्रार निवारण समिती त्याची सत्यासत्यता पडताळून पाहील.

९) पात्र नसलेल्या खेळाडूस स्पर्धेत खेळविणे ही फसवणूक समजली जाईल व त्याविरुद्ध कडक कारवाई केली जाईल. एखाद्या संस्थेने आपल्या संघात, स्पर्धेच्या नियमांप्रमाणे पात्र नसलेल्या विद्यार्थ्यास / खेळाडूस खेळविल्याची तक्रार झाल्यास व तक्रारीत तथ्य आढळल्यास त्या संघाला रु. ५०००/- इतका दंड केला जाईल व ही दंडाची रक्कम यजमान संस्थेला देण्यात येईल.

१०) पंचांच्या निर्णयाविरुद्ध कोणत्याही प्रकारचा तक्रार अर्ज स्विकारला जाणार नाही.

११) तक्रार निवारण समितीने कोणत्याही तक्रारीचा निर्णय, सामना संपल्यानंतर जास्तीत जास्त दोन तासात देणे बंधनकारक राहील.

**विशेष लक्ष - पोलिस केस करू नये.**

**१८) सर्व साधारण विजेतेपद (General Championship)**

१) मैदानी खेळांच्या स्पर्धांमध्ये जी संस्था सर्वाधिक गुण प्राप्त करेल त्या संस्थेस विभागीय व आंतर विभागीय सर्वसाधारण विजेतपद बहाल केले जाईल. हे गुण खाली दिलेल्या तक्त्याप्रमाणे दिले जातील.

| | वैयक्तिक | रिले | सांघिक खेळ | |
|---|---|---|---|---|
| प्रथम क्रमांक | ०५ | १२ | विजेता | १२ |
| व्दितीय क्रमांक | ०३ | १० | उपविजेता | ०८ |
| तृतीय क्रमांक | ०१ | ०८ | | |

२) वेटलिफ्टिंग व कुस्तीमधील सर्वसाधारण विजेतेपद निरनिराळ्या प्रकारात एकूण जास्तीत जास्त गुण मिळविणाऱ्या संघास बहाल केले जाईल.

**१९) बरोबरी (Ties)**

वैयक्तिक किंवा सांघिक सर्वसाधारण विजेतेपदाचे गुण समान झाले तर अशावेळी वैयक्तिक व सांधिक स्पर्धेत ज्या संघाने / खेळाडूने प्रथम क्रमांकाची जास्तीत जास्त बक्षिसे मिळविली आहेत, त्या संघास सर्वसाधारण विजेतेपद द्यावे. हे गुणही समान होत असल्यास द्वितीय क्रमांक विचारात घेऊन सर्वसाधारण विजेतेपद द्यावे. या सर्व प्रक्रियेनंतरही गुण समान होत असल्यास किंवा योग्य निर्णय होत नसल्यास दोन्ही संघांना सर्वसाधारण विजेतेपद विभागून द्यावे.

**२०) पदके व प्रमाणपत्रे (Trophies & Certificates)**

१) प्रत्येक विभागाच्या व आंतर विभागाच्या अध्यक्षांना अंदाजपत्रकात कायम स्वरुपी तरतूद करून पदके देण्याचा अधिकार राहील. सदरची पदके कायमस्वरुपात फक्त विजेता व उपविजेता यांनाच दिली जातील.

१) सर्वसाधारण विजेतेपद (मुली) २) सर्वसाधारण विजेतेपद (मुले)

३) वैयक्तिक विजेतेपद (मुली) ४) वैयक्तिक विजेतेपद (मुले)

२) विभागीय व आंतरविभागीय स्पर्धेच्या वेळी सांघिक व वैयक्तिक विजेत्या व उपविजेत्या खेळाडूंना प्रमाणपत्रे प्रदान करण्यात येतील.

३) विभागीय स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना (सांघिक / वैयक्तिक) यजमान संस्था पदके / मानचिन्ह देईल.

**२१) इंटर डिप्लोमा विभागीय व आंतरविभागीय ॲथलेटिक्स स्पर्धांची सुरुवात शक्य झाल्यास खालील प्रकारे करण्यात यावी, त्यांची रुपरेषा खालीलप्रमाणे -**

१) उद्घाटन समारंभ

२) उद्घाटन समारंभाच्या प्रमुख पाहुण्यांचे आगमन झाल्यानंतर विभागीय समिती सदस्यांची त्यांच्याशी ओळख करून द्यावी.

३) ध्वज संचलनाच्यावेळी प्रत्येक संघातील खेळाडू तीन-तीनच्या रांगेत उभे राहतील. हे क्रम संस्थांच्या आद्याक्षरांप्रमाणे राहतील. गतविजेता संघ संचलनाचे नेतृत्व करेल.

४) प्रत्येक संघाकडे आपल्या संस्थेने निश्चित केलेला ध्वज असावा.

५) असोसिएशनचा ध्वज फडकविला जाईल.

६) यानंतर शपथविधी कार्यक्रम होईल. ही शपथ यजमान संस्थेच्या संघाचा कर्णधार देईल.

७) उद्घाटनाचे प्रमुख पाहुणे उद्घाटनाची औपचारिक घोषणा करतील.

८) यानंतर स्पर्धांना सुरुवात होईल.

स्पर्धांचा सांगता समारंभही याचप्रकारे औपचारिकपणे होईल.

**२२) इतर (निवास व्यवस्था)**

स्पर्धेचे आयोजन करणाऱ्या यजमान संस्थेने स्पर्धेसाठी येणाऱ्या पाहुण्या संघांच्या निवासाची व्यवस्था करावयाची आहे. यासाठी यजमान संस्थेने निश्चित केलेले निवासशुल्क पाहुण्या संघांना भरणे अनिवार्य आहे. स्पर्धेपूर्वी शुल्क भरावे अन्यथा संघ स्पर्धेसाठी पात्र होणार नाही.

**२३) खेळाडूंचा निवास व भोजन भत्ता (बदलाचे आधीन)**

यासाठीचा आवश्यक खर्च संबंधित संस्थेने करावयाचा आहे. तो खालील प्रमाणे राहील.

अ) १) स्थानिक स्पर्धेसाठी रु. ५०/- दर दिवशी दर डोई.

२) बाहेरील स्पर्धेसाठी रु. १००/- दर दिवशी दर डोई.

ब) संघ व्यवस्थापकांना हा भत्ता नियमाप्रमाणे देण्यात यावा.

INTER ENGINEERING DIPLOMA STUDENTS' SPORTS ASSOCIATION

ELIGIBILITY FORM

(PROFORMA-A)

NAME OF THE INSTITUTE -

NAME OF THE EVENT-

| SR. No | Name of the player | Enrollment No. | Present Class | Year of Passing Qualifying Examination | First Admission to Diploma Date/Year | Date of Birth | Signature |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | |
| 2 | | | | | | | |
| 3 | | | | | | | |
| 4 | | | | | | | |
| 5 | | | | | | | |
| 6 | | | | | | | |
| 7 | | | | | | | |
| 8 | | | | | | | |
| 9 | | | | | | | |
| 10 | | | | | | | |
| 11 | | | | | | | |
| 12 | | | | | | | |

Certified that these students are the bonafide students of our institute.

Prof. In-Charge Sports (Institute Seal) Principal

INTER ENGINEERING DIPLOMA STUDENTS' SPORTS ASSOCIATION

ELIGIBILITY FORM

NAME OF THE INSTITUTE - ____________________________________________.

Zone-______________________ NAME OF THE EVENT- Athletics

| SR. No | Name of the player | 100M (Y/N) | 200M (Y/N) | 400M (Y/N) | 800M (Y/N) | 1500M (Y/N) | LongJump (Y/N) | HighJump (Y/N) | HOPSTEP (Y/N) | Shotput (Y/N) | Javelin Throw (Y/N) | Discus Throw | Relay 4 X 100 |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | | | | | |
| 2 | | | | | | | | | | | | | |
| 3 | | | | | | | | | | | | | |
| 4 | | | | | | | | | | | | | |
| 5 | | | | | | | | | | | | | |
| 6 | | | | | | | | | | | | | |
| 7 | | | | | | | | | | | | | |
| 8 | | | | | | | | | | | | | |
| 9 | | | | | | | | | | | | | |
| 10 | | | | | | | | | | | | | |
| 11 | | | | | | | | | | | | | |
| 12 | | | | | | | | | | | | | |

Certified that these students are the bonafide students of our institute.

Prof. In-Charge Sports (Institute Seal) Principal

**२४) शपथ (OATH)**

"I swear that I shall take part in the Zonal and Interzonal Tournaments respecting the rules and regulations which govern and with the desire to participate in the true spirit of sportsmanship for the honour of our Association and for the glory of sports."

"मी शपथ घेतो की मी संघटनेने घालून दिलेल्या नियमांचा सन्मान ठेऊन खिलाडूवृत्तीने विभागीय व आंतर विभागीय स्पर्धांमध्ये भाग घेईन आणि आमच्या संघटनेच्या सन्मानासाठी आणि खेळाच्या गौरवासाठी स्पर्धेमध्ये भाग घेईन."

## सांघिक खेळाचा तक्ता

| अ. क्र. | खेळाचे नाव | संघात प्रत्यक्ष खेळणारे खेळाडू | राखीव खेळाडू | एकूण खेळाडू प्रमाणपत्रांची संख्या |
|---|---|---|---|---|
| 1) | कबड्डी | 7 | 5 | 12 |
| 2) | खो-खो | 9 | 6 | 15 |
| 3) | व्हॉलीबॉल | 6 | 6 | 12 |
| 4) | बास्केटबॉल | 5 | 7 | 12 |
| 5) | हॉकी | 11 | 5 | 16 |
| 6) | फुटबॉल | 11 | 5 | 16 |
| 7) | बॅडमिंटन | 2+1 | 2 | 5 |
| 8) | टेबल टेनिस | 2+1 | 2 | 5 |
| 9) | क्रिकेट | 11 | 5 | 16 |
| 10) | कॅरम | 4 | 2 | 6 |
| 11) | 4 X 100 मीटर रिले | 4 | 1 | 5 |
| 12) | बुद्धिबळ | 4 | 1 | 5 |

वरील प्रमाणे राखीव खेळाडू असावेत, परंतु संस्थेस खेळाडू उपलब्ध न झाल्यास राखीव खेळाडू कमी करण्याचा अधिकार त्या संस्थांना देण्यात आला आहे.

---

*** स्पर्धेचे सर्वसाधारण नियम :**

१) प्रत्येक संघाचा पात्रता फॉर्म (Eligibility) नविन प्रोफार्मा A विहीत नमुन्यात सुवाच्य अक्षरात लिहिलेला असावा किंवा प्रिंट केलला असावा. प्रोफॉर्मामध्ये कोणत्याही प्रकारची खाडाखोड असू नये. प्रोफॉर्मामधील सर्व कॉलम पूर्णपणे भरलेले असावेत.

२) खेळाडू / स्पर्धकाच्या जन्मतारखेच्या पुराव्यासाठी फक्त इयत्ता १० वी च्या प्रमाणपत्राची संस्थेच्या प्राचार्यांनी साक्षांकित केलेली सत्यप्रत असावी. तसेच इयत्ता १२ वी उत्तीर्ण झालेल्या परिक्षेचे मार्कलिस्ट किंवा प्रमाणपत्राची सत्यप्रत असावी. जर खेळाडूने गॅप घेतलेली असेल तर गॅप सर्टिफिकेट रु. १०० च्या स्टॅम्प पेपरवर असावे. ते त्या वर्षाच्या प्रवेशावेळचे किंवा तत्पूर्वीचे असावे.

३) प्रत्येक खेळाडूकडे स्वतःचे ओळखपत्र असलेच पाहिजे.

४) खेळाडू / संघ संबंधित खेळाच्या गणवेशात असेल तरच त्या खेळाडूस / संघास क्रीडा स्पर्धेत भाग घेता येईल. योग्य गणवेशात खेळाडू नसतील तर त्या खेळाडूस / संघास क्रीडास्पर्धेत भाग घेऊ दिला जाणार नाही याची सर्व संस्थाप्रमुख व क्रीडाप्रमुख यांनी नोंद घ्यावी.

५) प्रत्येक संघाबरोबर त्या त्या संस्थेच्या संघ व्यवस्थापकाने संघाचा खेळ / स्पर्धा संपेपर्यंत स्पर्धास्थळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. अन्यथा त्या संघाचा क्रीडा स्पर्धेतील सहभाग रद्द समजण्यात येईल.

६) संबंधित संघाचे संघ व्यवस्थापक हेच संघाचे प्रशिक्षक राहतील. क्रीडा स्पर्धेच्यावेळी संघाची बाजू मांडण्याचा अधिकार केवळ त्यांचाच राहील. इतर कोणत्याही व्यक्तिस संघाची बाजू मांडता येणार नाही.

७) क्रीडास्पर्धेच्या वेळी संयोजकांनी जे पंच नियुक्त केलेले असतील त्यांचा निर्णय अंतिम व बंधनकारक राहील.

८) सर्व संघांनी खेळांच्या नियमांचे व शिस्तीचे पालन करावे.

९) क्रीडा स्पर्धेत भाग घेणाऱ्या सर्व संघांचे लॉट्स स्पर्धेच्या आदल्या दिवशी पाडले जातील.

१०) दोन वैयक्तिक क्रीडा प्रकारात व दोन सांघिक क्रीडा प्रकारात अशा पद्धतीने खेळाडू स्पर्धेत भाग घेऊ शकेल.

११) पात्रता तपासणीकरिता खेळाडू नवीन प्रवेश (प्रथम वर्ष) असल्यास इ. १० वी किंवा इ. १२ वी प्रमाणपत्र आणि द्वितीय किंवा त्या पुढील वर्षासाठी खेळत असलेल्या खेळाडूस हिवाळी किंवा उन्हाळी म्हणजेच लगतच्या परीक्षेचे हॉल तिकिटाची मूळ प्रत सोबत आणावी लागेल. पात्रता तपासून पूर्ण खात्री झाल्यावरच खेळाडूस / संघास खेळू दिले जाईल.

१२) स्पर्धेसाठी कमीत कमी चार संघ असल्याखेरीज सदरची स्पर्धा घेण्यात येऊ नये.

१३) स्पर्धा संपल्यानंतर आयोजक संस्थेने स्पर्धेचा निकाल त्वरीत विभागीय मुख्यालय, राज्य मुख्यालय तसेच आंतरविभागीय स्पर्धा आयोजकांकडे पाठविणे बंधनकारक आहे.

१४) संयोजकांनी दिलेल्या तारखेस आपल्या संघाचा सहभाग असल्याचे पत्र पाठविल्याची खात्री करून घ्यावी. त्या तारखेस आपले प्रवेश पत्र संयोजकांना न मिळाल्यास आपल्याला प्रवेश दिला जाणार नाही.

१५) वैयक्तिक क्रीडा प्रकारात उडी, फेकी यामध्ये क्वालीफाय न झाल्यास पुढील उडी किंवा फेकीसाठी आपणास अपात्र ठरविले जाईल.

१६) क्रिकेट स्पर्धेसाठी खेळाडूंना गणवेशातच येणे बंधनकारक आहे. अन्यथा त्या संघास प्रवेश दिला जाणार नाही. ही स्पर्धा वीस षटकांची घेण्यात यावी. स्पर्धेसाठीचा चेंडू संयोजकांकडून पुरविला जाईल. चेंडूचे पैसे संयोजकाकडे स्पर्धेच्या वेळी भरावे लागतील.

१७) बॅडमिंटन व टेबलटेनिस या स्पर्धांच्या वेळी स्पर्धकांनी योग्य त्या गणवेशात यावे अन्यथा प्रवेश दिला जाणार नाही. तसेच शटलकॉक व टी. टी. बॉल संयोजकांकडून पुरविला जाईल. त्याचे शुल्क संयोजकांकडे स्पर्धेच्या वेळी भरावे लागेल.


* क्रीडा प्रकार व त्यांचे तांत्रिक नियम

या स्पर्धेसाठी खालील क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात येईल.

**१) सांघिक क्रीडा प्रकार (Team Events):**

**व्हॉलीबॉल**

व्हॉलीबॉल स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जातात.




स्पर्धा पासिंग व्हॉलीबॉल पद्धतीने व्हॉलीबॉल असोसिएशनच्या नियमाच्या बदलास अधीन राहून खेळविण्यात येतील.

- क्रीडागणांच्या दोन्ही बाजूस मध्य रेषेच्या बाहेर १ मी. अंतरावर दोन्ही खांब असावेत.
- खेळ चालू नसताना सरपंच किंवा पंच यांच्या परवानगीने मार्गदर्शक किंवा संघनायकाच्या मागणीनुसार खेळाडूची अदलाबदल करता येते.
- स्पर्धा या रोटेशन पद्धतीने घेतल्या जातील.
- खेळ चालू नसताना संघनायक किंवा मार्गदर्शकाच्या विनंतीवरून टाईमआऊट घेता येतो.
- प्रत्येक सेट मध्ये संघाला दोन वेळा टाईमआऊट मागता येतो.
- टाईमआऊट ची वेळ ३० सेकंदाची असते.
- व्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये प्रत्येकी २५ गुणांचे दोन सेट होतील. तीन सेट पैकी कोणतेही दोन सेट/गेम जिंकणारा संघ विजेता होईल. अंतिम सेट हा १५ गुणांचाच राहील.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.
  मैदान १८ मी x ९ मी असते.
  जमिनीपासून नेटची उंची : मुलांसाठी २४३ सेंमी
  जमिनीपासून नेटची उंची: मुलींसाठी २२४ सेंमी
  चेंडूचे वजन ४८० ग्रॅम ते ५२० ग्रॅम पर्यंत असावे.

## खो-खो

खो-खो स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जातात.

- क्रीडांगणाच्या चारी बाजूस १.५ मी. मोकळी जागा असावी.
- मुले व मुली यांच्यासाठी ७ मिनिटांची एक आक्रमणाची व एक संरक्षणाची पाळी मिळून एक डाव होतो. प्रत्येक सामना दोन डावांचा होतो. दोन डावांमध्ये चार मिनिटांची विश्रांती राहील.
- गुणांची बरोबरी झाल्यास पुन्हा ७/७ मिनिटांचा एक डाव खेळवला जाईल.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.
- आक्रमणाची पाळी चालू असताना संघनायक किंवा मार्गदर्शकाने गुणलेखकाकडे मागणी केल्यास खेळाडुंची अदलाबदल करता येते.


  या क्रीडा प्रकारात एकूण १५ खेळाडू असतात.

  त्यापैकी ९ खेळाडू प्रत्यक्ष खेळतात व ६ खेळाडू राखीव असतात.

  मैदान २७ मी x १६ मी मुलांसाठी व मुलींसाठी समान असते.

  मैदान हे पूर्वपश्चिम असे असावे. (बाकी सर्व खेळांची क्रिडांगणे दक्षिण उत्तर असावीत.)

  ३५ x ३५ सें. मी. चे मधील ८ चौकोन असावेत,





## बास्केट बॉल

वास्केट बॉल स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जातात.

- बास्केट बॉल हा खेळ आउटडोर व इनडोर अशा दोन्ही ठिकाणी खेळतात.
- क्रीडांगणाच्या चारी बाजूस दोन मीटर मोकळी जागा असावी.
- क्रीडांगणावर ७ मीटर उंचीपर्यंत कोणताही अडथळा असू नये.

- बास्केट बॉलसाठी मैदान २८ मी. X १५ मी. चे असते.
- चेंडूचा परीघ ७५ सेंमी पेक्षा कमी व ७८ सेमी पेक्षा जास्त नसावा. तसेच वजन ६०० ग्रॅम एवढे असावे.
- संघातील खेळाडूंच्या पाठीवर व छातीवर ठळकपणे दिसतील असे क्रमांक (००ते ९९ यापैकी )असावेत. मुलांसाठी ७ नंबर व मुलींसाठी ६ नंबरचा बास्केटबॉल अनिवार्य आहे.
- स्पर्धेत दहा-दहा मिनिटांचे चार डाव खेळवावेत. पहिल्या डावानंतर २ मिनिटांची विश्रांती, दुसऱ्या डावानंतर १५ मिनिटांची विश्रांती व तिसऱ्या डावानंतर ४ मिनिटांची विश्रांती राहील. पूर्ण वेळ होऊनही सामन्याचा निर्णय न झाल्यास ५ मिनिटांचा आणखी एक डाव खेळवला जाईल व निर्णय घेतला जाईल.
- खेळ चालू नसताना किंवा गोल झाल्यानंतर संघाचा कोच गुण लेखकाला टाईमआऊट ची मागणी करू शकतो.
- प्रत्येक डावामध्ये प्रत्येक संघाला दोन वेळा टाईम आऊट मागता येतो व वाढीव वेळेमध्ये एक वेळा टाईमआऊट घेता येतो. टाईमआऊट हा ६० सेकंदाचाच असेल.
- खेळ चालू नसताना खेळाडूंची अदला बदल गुणलेखकांच्या परवानगीने करता येते.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.




**बास्केट बॉल मैदान**

### हॉकी

हॉकी स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवाव्यात.

- हॉकी खेळासाठी १०० मी x ६० मी चे मैदान असावे.
- १५+१५+१५+१५ मिनिटांच्या चार भागांमध्ये या स्पर्धा होतील. १५ मिनिटांच्या पहिल्या भागाच्या खेळानंतर मध्ये ५ मिनिटांची विश्रांती राहील.
- तात्पुरत्या कालावधीसाठी किंवा सामना संपेपर्यंत शासन देऊन बाहेर घालवलेल्या खेळाडूच्या जागी बदली खेळाडू घेता येणार नाही.
- अधिक गोल करणारा संघ विजयी होईल.
- सामना गोल न होता किंवा गोल होऊन बरोबरीने रहात असेल तर अशा वेळी पेनल्टी स्ट्रोक वर निकाल दिला जाईल. जादा वेळ देऊन सामना खेळवला जाणार नाही.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.





हॉकी क्रीडांगण

### फुटबॉल

फुटबॉल स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जाव्यात.

- खेळासाठी मैदान प्रमाणित असावे.
- स्पर्धेच्या दरम्यान गोलीसह फक्त व खेळाडूंची अदला बदल पंचांच्या परवानगीने करता येईल.
- पंचांनी शासन केलेल्या खेळाडूच्या जागी बदली खेळाडू खेळवता येणार नाहीत.
- अधिक गोल करणारा संघ विजयी होईल.
- सामना गोल न होता किंवा गोल होऊन बरोबरीने राहत असेल तर अशा वेळी पेनल्टी स्ट्रोक वर निकाल दिला जाईल. जादा वेळ देऊन सामना खेळवला जाणार नाही.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.




फूटबॉल क्रीडांगण

**बॅडमिंटन**

बॅडमिंटन स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जाव्यात.

- मैदानाच्या मध्य रेषेवर दोन्ही बाजूच्या खांबास ५ फूट १ इंच उंचीचे जाळीचे नेट बांधलेले असावे. त्या नेटची लांबी २० व रुंदी २.६ फूट असावी.
- प्रत्येक सामन्यामध्ये स्पर्धा सिंगल, डबल व गरज पडल्यास सिंगल याप्रमाणे खेळविल्या जातील.
- प्रत्येक सामना ३ गेमचा खेळवला जाईल व या ३ गेम पैकी २ गेम जिंकणारा खेळाडू / संघ विजयी होईल. प्रत्येक गेम हा १५ गुणांची असेल.
- स्पर्धेसाठी स्वतःचे शटल कॉक वापरता येणार नाहीत. संयोजकांकडून त्याचा पुरवठा केला जाईल व त्याचे शुल्क प्रत्येक संघास भरावे लागेल.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.




बॅडमिंटन क्रीडांगण

**क्रिकेट**

क्रिकेट स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जाव्यात.

- क्रिकेट स्पर्धा ह्या २० षटकांच्या होतील व त्यासाठी ८० मिनिटांचा कालावधी दिला जाईल.
- एका गोलंदाजास जास्तीत जास्त ४ षटके टाकण्याचा अधिकार राहील.
- स्पर्धा या फक्त सिझन बॉलवरच खेळल्या जातील.
- संयोजकांनी बॉल हा फोर पीस वापरणे बंधनकारक आहे.
- खेळपट्टी ज्या ठिकाणी उपलब्ध नसेल त्या ठिकाणी स्पर्धा मॅट वर खेळवणे आवश्यक आहे.
- चालू खेळामध्ये बॉल बदलता येणार नाही. जर बॉल हरवला किंवा वापरण्यास अयोग्य झाला तर पंचांच्या परवानगीने बॉल बदलता येईल.
- स्पर्धेसाठी स्वतःचे बॉल वापरता येणार नाहीत. संयोजकांकडून बॉल घेणे बंधनकारक राहील. मात्र त्याचे शुल्क भरावे लागेल.
- नैसर्गिक आपत्तीमुळे सामना सुरु करता येत नसेल तर त्या सामन्याचा निकाल टॉसवर दिला जाईल.
- चालू सामन्यामध्ये काही व्यत्यय आला आणि तो सामना पूर्ण करता येत नसेल तर प्रचलित क्रिकेट नियमानुसार निकाल दिला जाईल.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.
- सामना बरोबरीत राहीला तर 'सुपर ओव्हर' खेळवून निर्णय घेतला जाईल.




**क्रिकेट क्रीडागंण**

**टेबल टेनिस**

टेबल  टेनिस स्पर्धा सुधारित नियमानुसार खेळवल्या जाव्यात.


- टेबल टेनिसच्या टेबलांची लांबी ९ फुट, रुंदी ५ फुट व उंची २.६ फूट असते.
- टेबल टेनिसच्या बॉलचा व्यास ४० मिमी असला पाहिजे.
- टेबल टेनिस साठी कोणत्याही आकाराची, मापाची व वजनाची रॅकेट असू शकते.
- रॅकेटच्या एका बाजूस लाल व दुसऱ्या बाजूस काळा रंग असतो.
- प्रत्येक सामन्यामध्ये स्पर्धा सिंगल, डबल व गरज पडल्यास सिंगल याप्रमाणे खेळविल्या जातील.

- प्रत्येक सामना ३ सेटचा खेळवला जाईल. ३ पैकी कोणतेही दोन सेट जिंकणारा खेळाडू / संघ विजयी होईल. एक सेट हा ११ गुणांचा असेल.
- स्पर्धेसाठी स्वतःचे टी.टी. बॉल वापरता येणार नाहीत, संयोजकाकडून त्याचा पुरवठा केला जाईल व त्याचे शुल्क प्रत्येक संघास भरावे लागेल.
- सर्व स्पर्धा बाद पद्धत्तीने घेतली जाईल.

**कबड्डी**

कबड्डी चे मैदान मुले १३ मी x १० मी व मुली १२ मी x ०८ मी एवढे असेल.

- कबड्डी मुले व मुली यांच्या स्पर्धेसाठी २०-२० मिनिटांचे दोन डाव खेळवले जातील.
- प्रत्येक डावामध्ये प्रत्येक संघाला दोन वेळा टाईमआऊट मागता येतो. टाईमआऊट हा ४५ सेकंदाचाच असेल.
- टाईम आऊटच्या कालावधीमध्ये बदली खेळाडूची अदलाबदल गुणलेखकांच्या परवानगीने करता येते.
- खेळ चालू असताना खेळाडू जखमी झाल्यास संघनायक पंचांकडे बदली खेळाडूची मागणी करु शकतो.
- खेळामध्ये गैर वर्तन करणाऱ्या खेळाडूस निलंबीत केले तर त्याच्या जागी बदली खेळाडू घेता येत नाही.
- निर्धारित वेळेमध्ये सामना बरोबरीत राहिला तर वाढीव वेळेमध्ये दोन्ही संघांना आळीपाळीने ५/५ चढाया करण्याची संधी दिली जाईल. त्यानंतरही बरोबरी झाल्यास नाणेफेक करून 'गोल्डन रेड' देण्यात येईल.
- सर्व स्पर्धा बाद पद्धतीने होतील.




**कॅरम**

कॅरम स्पर्धा बदललेल्या सुधारित नियमानुसार खेळवल्या जाव्यात.

- प्रत्येक सामन्यामध्ये स्पर्धा सिंगल, डबल व सिंगल याप्रमाणे खेळविल्या जाव्यात.

**अॅथलेटिक्स (मैदानी खेळ) - मुले**

१) ४ X १०० मी रीले (सांघिक खेळ)

टीप - ४ X ४०० मी रीले रद्द करण्यात आली आहे.

२) वैयक्तिक क्रीडा प्रकार

१) १०० मी धावणे
२) २०० मी धावणे
३) ४०० मी धावणे
४) ८०० मी धावणे
५) १५०० मी धावणे
६) लांब उडी (Long Jump)
७) उंच उडी (High Jump)
८) तिहेरी उडी (Hopstep)
९) गोळा फेक (Shot Put)
१०) भाला फेक (Javelin Throw)
११) थाळी फेक (Discus Throw)

टीप- ३००० मी व ५००० मी धावणे स्पर्धा रद्द करण्यात आल्या आहेत.

- स्पर्धक आवश्यकतेनुसार स्पोर्टस शुज व स्पाईकचा वापर करतील.
- खेळाडूच्या पाठीवर व छातीवर क्रमांक असणे आवश्यक आहे.
- ॲथलेटीक्स स्पर्धेसाठी असोसिएशन ने ठरवलेल्या विहीत नमुन्यातीलच प्रवेश यादी स्विकारली जाईल.
- ॲथलेटीक्स स्पर्धेमध्ये एक खेळाडू रिलेशिवाय आणखी तीनच प्रकारात भाग घेऊ शकतो. परंतु संयोजकांनी तयार केलेले वेळापत्रक त्या खेळाडूवर बंधनकारक राहील.

**बुद्धिबळ (CHESS)**

- बुद्धिबळ हा सांघिक खेळ आहे.
- स्पर्धा फिडेच्या नियमानुसार खेळवाव्यात. प्रत्येक संघामध्ये चार खेळाडू व एक राखीव खेळाडू असेल.
- बुद्धिवळ ही स्पर्धा गुणांच्या आधारावर खेळविण्यात यावी, फक्त सहा राऊंड घेण्यात यावेत.
- स्पर्धकांना गुणांनुसार खेळवावे. ज्या स्पर्धकांचे गुण समान आहेत. त्यांच्यामध्ये सामने खेळविले जावे. शक्यतो एकाच संस्थेमध्ये स्पर्धकांमध्ये सामना खेळविला जाऊ नये. अंतिम सामन्याच्या वेळी तसे झाल्यास स्पर्धा खेळविल्यास काही हरकत घेऊ नये. समान गुण झाल्यास खालील प्रमाणे टाय सोडवावा.
- S. B. Count: ज्यांना ज्यांना हरवले आहे त्यांनी मिळविलेल्या गुणांची एकूण बेरीज.
- ही बेरीज करताना ज्यांच्या बरोबर सामना बरोबरीत झालेला आहे. त्यांचे अर्धेगुण घ्यावेत ज्यांच्याकडून हरला आहे त्यांचे गुण धरू नये.
- S. F. Count: आपल्या विरुद्ध खेळलेल्या सर्वांच्या एकूण गुणांची बेरीज.
- First Median: टाय सुटत नसेल तरच (S. B. S. F. Count) First Round, Last Round सोडून मधील चार राउंड मधील खेळाडूंच्या एकूण गुणांची बेरीज,
- Second Median: आपल्या विरुद्ध खेळलेल्या ३, ४ या राऊंडची बेरीज करणे.
- प्रत्येक संघाने सोबत दोन चेस बोर्ड व दोन चेस क्लॉक आणावे.
- संघास कर्णधार असणे आवश्यक आहे. कर्णधाराने बोर्ड ऑर्डर पंचांकडे देणे आवश्यक आहे.
- सदर स्पर्धा ही रॅपीड चेस पद्धतीची घेण्यात यावी. प्रत्येक सामना ५० मिनिटांचा असेल.

## २. वैयक्तिक क्रीडा प्रकार

**कुस्ती (Wrestling)**

- कुस्तीचे वजन गट खालील प्रमाणे
    १. ५७ किलो
    २. ६१ किलो
    ३. ६५ किलो
    ४. ७० किलो
    ५. ७४ किलो
    ६. ८६ किलो
    ७. ९७ किलो
    ८. १२५ किलो पर्यंत
- कुस्तीसाठी कॉस्च्युम (लाल/निळा), कुस्तीचे बूट असा पोषाख असावा.
- कुस्तीसाठी ३/३ मिनिटांच्या २ फेऱ्या होतील, फेऱ्यांमधील अवकाश ३० सेकंदाचा असेल.
- कोणत्याही फेरीमध्ये चितपट कुस्ती मारणारा कुस्तीगीर त्या कुस्तीचा विजेता ठरेल.
- प्रत्येक वजन गटाचा वजन घेण्याचा कालावधी हा फक्त अर्धा तास असतो.
- स्पर्धा पात्रता फेरी, बाद फेरी व अंतिम फेरी अशा पद्धतीने होतात.
- आंतरविभागीय स्पर्धेत खेळाडू हा विभागीय स्पर्धेत ज्या वजन गटात खेळला आहे त्याच वजन गटातच त्याला खेळता येईल.

**पोहणे (Swimming)**

१. मुक्त पध्दत ५० मि.
२. मुक्त पध्दत १०० मि.
३. ब्रेस्टस्ट्रोक पध्दत ५० मि.
४. ब्रेस्टस्ट्रोक पध्दत १०० मि.
५. बटरफ्लाय पध्दत ५० मि.
६. बटरफ्लाय पध्दत १०० मि.
७. बॅकस्ट्रोक पध्दत ५० मि.
८. बॅकस्ट्रोक पध्दत १०० मि.

**वजन उचलणे (Weight Lifting)**

- वजन गट खालील प्रमाणे
    १. ५६ किलो
    २. ६२ किलो
    ३. ६९ किलो
    ४. ७७ किलो
    ५. ८५ किलो
    ६. ९४ किलो
    ७. १०५ किलो
    ८. १०५ किलो वरिल
- वेट लिफ्टिंग स्पर्धा या क्लीन एन्ड जर्क व स्नॅच अशा दोन पद्धतीने घेतल्या जातात.
- प्रत्येक खेळाडूस प्रत्येक पद्धतीमध्ये ३/३ वेळा संधी दिली जाते त्या नुसार क्रमांक ठरवले जातात.
- स्पर्धा सुरु होण्यापूर्वी दोन तास अगोदर खेळाडूंची वजने घेतली जातात.
- स्पर्धेमध्ये वजन उचलण्यामध्ये दोन खेळाडूंमध्ये जेव्हा टाय होतो त्या वेळी त्या दोन खेळाडूंमधील ज्याचे वजन कमी असेल त्यास वरचा क्रमांक दिला जातो.

**क्रीडा स्पर्धा - मुली**

**सांघिक प्रकार**

- बॅडमिंटन बास्केट बॉल
- टेबल टेनिस व्हॉलीबॉल
- बुद्धिबळ कॅरम
- कबड्डी खो-खो

**ॲथलेटिक्स**

- पळणे-१०० मी.,२०० मी., ४०० मी., ८०० मी., ४X१०० मी.रिले
- उडी - लांब उडी, उंच उडी, तिहेरी उडी
- फेकी - गोळा फेक, थाळी फेक, भाला फेक

1. दरवर्षी होणाऱ्या जनरल बॉडी मिटींगमध्ये त्यावर्षी घेतले जाणारे क्रीडा प्रकार (मुले व मुली) निश्चित होतील. वैयक्तिक क्रीडाप्रकारात प्रथम व द्वितीय क्रमांकाचे मानकरी आंतर विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरतील.
2. प्रमाणित केलेला ध्वज प्रत्येक मुख्यालयाने स्वतः तयार करावा. त्याचा खर्च असोसिएशन मान्य करेल.

# IEDSSA: THE LIST OF ZONAL HEADQUARTERS

| Sr. No. | Zone | Name of Zonal H.Q. Institute | IEDSSA Co-ordinator Name | Mobile No. |
|---|---|---|---|---|
| 1 | A1 | Govt. Polytechnic, Pen | Mr. V.S. Sonawane | 9423577845 |
| 2 | A2 | Govt. Polytechnic, Mumbai | Mr. B. Bidgar | 8108678030 |
| 3 | B1 | Govt. Polytechnic, Kolhapur | Mr. P.H. Tarange | 9420447640 |
| 4 | B2 | Govt. Polytechnic, Miraj | Dr. V.S. Magar | 9529161844 |
| 5 | C | Govt. Polytechnic, Solapur | Mr. P.K. Killedar | 8668681482 |
| 6 | D1 | S.V.C.Polytechnic, Vadgaon | Mr. Yogesh L. Nimbalkar | 7775007475 |
| 7 | D2 | AISSMS Polytechnic, Pune | Mr N.A. Takawane | 9403313535<br>8308718809 |
| 8 | E1 | Govt. Polytechnic Ahmednagar | Mr. D.D. Ahirrao | 9422221177 |
| 9 | E2 | Govt. Polytechnic, Nashik | Mr. S. R. Deshmukh | 9423783062 |
| 10 | F | G.M.C. Polytechnic Shahada | Mr. S.N. Patil | 9922550967 |
| 11 | G1 | Govt. Polytechnic, Chhatrapati Sambhajinagar | Mr. Ganesh G. Ghuge | 7030244488 |
| 12 | G2 | Govt. Polytechnic, Nanded | Mr. G. B. Sude | 98235 17327 |
| 13 | H | Govt. Polytechnic, Amravati | Mr. Aditya N. Deshmukh | 7507533079 |
| 14 | I | Govt. Polytechnic, Nagpur | Mr. P.P. Patil | 9575757395 |

# IEDSSA: RULES COMMITTEE

| Sr.No. | Committee Member Name | Institute Name | Mobile No. |
|---|---|---|---|
| 1) | Dr.S.U. Tyade | Sports Director, Ramchandra Polytechnic, Pune | 9762779555 |
| 2) | Mr N.A. Takawane | AISSMS Polytechnic, Pune | 9403313535 |
| 3) | Mr. Umesh Jagtap | SVPMIT, Malegaon (Bk), Baramati, Pune | 9890639721 |
| 4) | Mr. Sarang Naik | K.K. Wagh Polytechnic, Nashik | 9923332950 |

# आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटना





## कार्यकारिणी (सन २०२४-२०२५)

| | |
|---|---|
| * पदसिध्द अध्यक्ष | : डॉ. राजेंद्र का. पाटील, प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे |
| * सचिव | : श्री. सुहास परांजपे, अधिव्याख्याता, यंत्र अभियांत्रिकी |
| * सहाय्यक सचिव | : श्री. स्वप्निल हातवळणे, अधिव्याख्याता, यंत्र अभियांत्रिकी |
| * खजिनदार | : डॉ. प्रविण ना. थोरात, अधिव्याख्याता, इंग्रजी |
| * सहा. कर्मचारी (खजिनदार सहा.) | : श्री. संतोष ब. शिंदे, कनिष्ठ लिपीक |
| * सहा. कर्मचारी (कार्यालयीन पत्रव्यवहार) | : श्री. प्रविण भोकरे, कनिष्ठ लिपीक |
| * सहा. कर्मचारी (रेकॉर्ड किपींग) | : श्री. निलेश आनंद मेटे |
| * प्रयोगशाळा सहाय्यक मदतनीस | : श्री. व्यंकट व्यं. बनला, पहारेकरी |

*** सुधारित घटना व नियमावली २०२४ - २०२५ पासून लागू ***